।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

1990
'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

कबचौउमवि/प्रकुका/MSFDA/बैठक/०२/२०२६ दि.०६/०१/२०२६

**प्रति,**
**मा. प्राचार्य/ संचालक**
**विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये व परिसंस्था**

**विषय:**-दि.८ जानेवारी, २०२६ रोजी ऑनलाईन "संवाद" या बैठकीला उपस्थित राहणेबाबत. .

**संदर्भ:**- कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था (MSFDA)यांचे दि.५ जानेवारी, २०२६ रोजीचे पत्र. .

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भिय पत्रान्वये कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नि महाविद्यालया समवेत खालील विषयावर साधण्यासाठी दि.८ जानेवारी, २०२६ रोजी ऑनलाईन "संवाद" या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

- NEP २०२० अंतर्गत होणाऱ्या बदलांच्या पार्श्वभूमीवर MSFDA च्या प्रशिक्षण कार्यक्रमांची सविस्तर माहिती देणे.
- प्राचार्य, अध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकरिता प्रशिक्षणाच्या गरजा समजून घेणे.
- MSFDA च्या नव्याने सुरु होत असलेल्या Learning Management System (LMS) बाबत अवगत करणे.

तरी आपल्या महाविद्यालयाकडून उपस्थित राहणाऱ्या प्राचार्य, उपप्राचार्य, अध्यापकांची नोंदणी दि.७ जानेवारी, २०२६ पर्यंत नोंदणी करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. सुलभ संदर्भासाठी संदर्भिय पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

**आपला**

**(प्रा. सोपान तुकाराम इंगळे)**
**प्र-कुलगुरू**

**प्रत:- मा. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था, पुणे**

उमविनगर, जळगाव - ४२५००१ (महाराष्ट्र) भारत , दुरध्वनी क्र.: ०२५७-२२५८४२८, २२५८४२९ फॅक्स क्र.: ०२५७-२२५८४०३,४०६
Umavinagar, Jalgaon - 425 001 (Maharashtra) INDIA, Telephone No. 0257- 2258428, 2258429
Fax No. 0257-2258403, 406. E-mail : registrar@nmu.ac.in Web: www.nmu.ac.in

Dr. Rajendra Bharud, I.A.S.
Executive Director

GOVERNMENT OF MAHARASHTRA
Department of Higher and Technical Education
Maharashtra State Faculty Development
Academy (MSFDA)

Maharashtra State
Faculty Development Academy

क्र. कासं/२०२६/००९ दि. ०५ जानेवारी, २०२६

**विषय :- दि. ०८ जानेवारी, २०२६ रोजी ऑनलाईन "संवाद" या बैठकीला उपस्थित राहण्याबाबत**

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त शिक्षकीय प्रवर्गातील अध्यापकांच्या व्यावसायिक क्षमतेचा प्रशिक्षणाद्वारे नियमित विकास करण्याकरीता महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थेची (MSFDA) स्थापना करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थेमार्फत विविध अध्यापक विकास प्रशिक्षण कार्यक्रमांचे (Faculty Development Program - FDP) आयोजन करण्यात येते. त्या अनुषंगाने काही प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी MSFDA संस्थेने महाराष्ट्रातील अनेक नामवंत शिक्षण संस्था, प्रशिक्षण संस्था, विद्यापीठे यांच्याशी सामंजस्य करार करण्यात आले आहेत.

यास अनुसरुन, **दिनांक ०८ जानेवारी, २०२६** रोजी ऑनलाईन 'संवाद' बैठक आपल्या विद्यापीठाधिनस्त सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांसाठी आयोजित करण्यात येत आहे.

**बैठकीचे मुद्दे खालीलप्रमाणे -**

1) NEP२०२० अंतर्गत होणाऱ्या बदलांच्या पार्श्वभूमीवर MSFDA च्या प्रशिक्षण कार्यक्रमांची सविस्तर माहिती देणे.
2) प्राचार्य, अध्यापक व शिक्षकेतर कर्मचा-यांकरिता प्रशिक्षणाच्या गरजा समजून घेणे.
3) MSFDA च्या नव्याने सुरू होत असलेल्या Learning Management System (LMS) बाबत अवगत करणे.

सदरील बैठकीसाठी आपणांस आमंत्रित करण्यात येत आहे. तसेच आपल्यामार्फत विद्यापीठाच्या अधिनस्त सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्य, उप-प्राचार्य, अधिष्ठाता यांना सूचित करुन बैठकीस उपस्थित राहण्यास कळविण्यात यावे, ही विनंती.

महाविद्यालयांकडून उपस्थित राहणाऱ्या प्राचार्य, उप-प्राचार्य, अध्यापकांची नोंदणी दिनांक ०७ जानेवारी, २०२६ पर्यंत https://tinyurl.com/MSFDA-KBCNMU या लिंकवरती करण्यास सांगण्यात यावे. बैठकीचे तपशील दि. ०७ जानेवारी, २०२६ रोजी सर्व उपस्थितांना ईमेलद्वारे कळविण्यात येईल.

**(डॉ. राजेंद्र भारुड)**
**कार्यकारी संचालक,**
**महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था,**
**पुणे**

**प्रति,**
**मा. कुलगुरु,**
**कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,**
**जळगांव**